Lokneta News - लोकनेता न्युज

महाराष्ट्राचा हक्काचा आवाज

दैनिक बीड लोकनेता

● मुख्य संपादक : ज्ञानेश्वर मुंढे ●

प्रतिनिधी नेमणूक सुरु आहे

Epaper: www.dainiklokneta.in/

दैनिक लोकनेता

दैनिक लोकनेता या दैनिकासाठी संपूर्ण महाराष्ट्राभर प्रतिनिधी नेमणूक सुरू आहे तरी इच्छुकांनी खालील इमेल किंवा नंबर वरती संपर्क साधावा. पात्र उमेदवारांना योग्य पदावर संधी देण्यात येईल.

मुख्य कार्यालय: मिरकाळा ता. गेवराई जि.बीड 7046383112

dnyaneshmofficial@gmail.com 7499615933

शनिवार दि.४ एप्रिल २०२६ RNI-MAHMAR/2023/89402 Email : dnyaneshmofficial@gmail.com वर्ष : ०३ अंक : २३१ किंमत २ रुपये 7499615933

# बारामतीत काँग्रेसने आपले मोठे मन दाखवावे:सुनेत्रा पवार यांच्या विरोधात उमेदवार न देण्याचे चंद्रशेखर बावनकुळे यांचे आवाहन

**लोकनेता न्यूज नेटवर्क**

**मुंबई (वृत्तसंस्था)**

अजित पवार यांच्या निधनामुळे रिक्त झालेल्या बारामती विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष तसेच महायुतीच्या वतीने सुनेत्रा पवार या उमेदवार असणार आहेत. त्यांच्या विरोधात उमेदवार देण्याचा प्रश्नच येत नसल्याचे सुप्रिया सुळे यांनी जाहिर केले आहे. मात्र, सुनेत्रा पवार यांच्या विरोधात उमेदवार देण्याची भूमिका काँग्रेसने घेतली आहे. या संदर्भात भारतीय जनता पक्षाचे नेते मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी काँग्रेसच्या नेत्यांना उमेदवार न देण्याची विनंती केली आहे. या संदर्भात माध्यमांशी बोलताना बावनकुळे म्हणाले की, काँग्रेसच्या नेत्यांना अजित दादा यांचा दीर्घ काळ सहवास लाभला आहे. काँग्रेस असो की, कोणत्याही पक्षाचा माणूस त्यांच्याकडे गेला तरी अजित पवार त्याचं काम करत होते. त्या अजित पवारांचीच ही सीट आहे. काँग्रेस सोबत अजित पवार यांचा अनेक वर्षांचा सहवास राहिला आहे. आयुष्यातील ७५ टक्के राजकारण अजित पवार यांनी काँग्रेसच्या नेत्यांच्या सहवासात घालवले आहे. त्यामुळे काँग्रेसच्या नेत्यांना माझी मागणी आहे की, त्यांनी ही सीट बिनविरोध करावे. राहुरी मध्ये त्यांची लढण्याची इच्छा असेल, तर त्यांनी लढावे. त्यांचा तो अधिकार आहे. त्या ठिकाणी आम्हीही लढायला तयार आहोत. मात्र, बारामती मध्ये आमच्या वहिनी सुनेत्रा पवार यांची निवडणूक आहे. ती सर्वांनीच बिनविरोध करावी, अशी आमची मागणी असल्याचे बावनकुळे यांनी म्हटले आहे.

राष्ट्रीय समाज पक्ष आणि वंचित बहुजन आघाडी यांचा देखील काँग्रेसला बारामतीमध्ये पाठिंबा असल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे या पक्षाच्या नेत्यांना देखील आम्ही हीच विनंती करत आहे. अजित पवार यांचा या सर्वांनाही सहवास राहिला आहे. अजित पवारांची आठवण अजूनही आपल्या सोबत आहेत. त्यांना जाऊन अजून वर्ष देखील झाले नाही. त्यामुळे किमान या निवडणुकीच्या माध्यमातून तरी काँग्रेसने आपले मोठे मन दाखवावे, असे आवाहन बावनकुळे यांनी केले आहे.राष्ट्रवादीच्या दोन्ही पक्षाच्या विलिनीकरण संदर्भातला निर्णय हा सुनेत्रा पवार यांचाच असेल. त्या त्यांच्या पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा आहेत. त्यामुळे विलिनीकरण संदर्भातला त्यांनी घेतलेला निर्णय अंतिम असेल. त्यामुळे या संदर्भात काही बोलण्यास बावनकुळे यांनी नकार दिला आहे.



# दैनिक लोकमत समुहाचे राजेंद्र दर्डा आणि अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम. देशमुख यांची छत्रपती संभाजीनगरमध्ये सदिच्छा भेट

**लोकनेता न्यूज नेटवर्क**

**बीड । विजय रोडे**



दैनिक लोकमत समूहाच्या एडिटोरियल बोर्डाचे चेअरमन आणि माजी मंत्री श्री.राजेंद्र दर्डा यांची अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त श्री.एस.एम.देशमुख यांनी आज छत्रपती संभाजीनगर येथील दैनिक लोकमत च्या मुख्य कार्यालयात सदिच्छा भेट घेतली.पत्रकारिता क्षेत्रातील या दोन दिग्गज व्यक्तिमत्त्वांमध्ये झालेल्या या भेटीमुळे माध्यम वर्तुळात चर्चा रंगली आहे. या भेटीदरम्यान उभय नेतृत्वामध्ये पत्रकारितेसमोरील सद्यस्थिती, डिजिटल मीडियाचे वाढते महत्त्व आणि पत्रकारांच्या विविध समस्यांवर सविस्तर चर्चा झाली. अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेच्या राज्यभरात सुरु असलेल्या कामकाजाची माहिती देण्याबरोबरच येत्या १८ आणि १९ एप्रिल २०२६मध्ये उदगीर या ठिकाणी होत असलेल्या अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेच्या ४४ वे राष्ट्रीय अधिवेशनचे उद्घाटक म्हणून रितसर निमंत्रण


दैनिक लोकमत समूहाच्या एडिटोरियल बोर्डाचे चेअरमन आणि माजी मंत्री श्री.राजेंद्र दर्डा यांना

मुख्य विश्वस्त श्री.एस.एम.देशमुख यांनी दिले. यावेळी मराठी पत्रकार परिषदेच्या माध्यमातून सुरू असलेल्या कार्याची माहिती सुद्धा श्री.दर्डा यांना दिली. श्री.राजेंद्र दर्डा यांनीही लोकमतच्या प्रवासातील अनुभव सांगत पत्रकारितेची मूल्ये जपण्यावर भर दिला. यावेळी मराठी पत्रकार परिषदेचे विश्वस्त शरद पाबळे, डिजिटल मिडिया परिषदेचे प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे, प्रदेश सदस्य जितेंद्र सिरसाट आणि लोकमत कार्यालयातील वरिष्ठ अधिकारी आणि पत्रकार उपस्थित होते. अत्यंत मनमोकळ्या गप्पा आणि खेळीमेळीच्या वातावरणात पार पडलेल्या या भेटीने पत्रकारितेतील ज्येष्ठ आणि मार्गदर्शक नेतृत्वांमधील समन्वय पुन्हा एकदा अधोरेखित केला आहे.

# स्वानंद सार्वजनिक वाचनालयात महावीर जयंती,जागतिक रंगभुमी दिन,श्रीरामनवमी सांस्कृतीक कार्यक्रमाने संपन्न

**लोकनेता न्यूज नेटवर्क**

**केज । प्रतिनिधी**




स्वानंद सार्वजनिक वाचनालय,आनंदगांव ता.केज जि.बीड येथे दि. ३१ मार्च २०२६ रोजी भगवान महावीर जयंती साजरी करण्यात आली. सर्वप्रथम भगवान महावीर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून पुजन व वंदन करण्यात आले.त्यानंतर अहिंसा परमो धर्म या विषयावर ग्रंथालयाचे संस्थापक, जेष्ठ विचारवंत,जेष्ठ समाजसेवक,महाराष्ट्रा तील सुप्रसिद्ध वक्ते व परखड व्याख्याते प्राचार्य,डॉ.वसुदेव बप्पा गायकवाड यांचेव्याख्यान झाले.त्यानंतर घेण्यात आलेल्या परिसंवादात माजी सरपंच रामराजे गायकवाड,एस.के.वैरागे, ज्ञानेश्वरी पुंड,आनंद भैय्या गायकवाड यांनी मार्गदर्शन केले.त्यानंतर चर्चासत्रात वेदिका गायकवाड,बालाजी टिंगरे,श्रद्धा गायकवाड, बाळासाहेब गायकवाड यांनी मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोप ए.बी. गायकवाड यांनी केला. दि.२७ मार्च २०२६ रोजी जागतिक रंगभूमी दिन एकपात्री नाटिका सादरीकरण करून साजरा करण्यात आला. वेदिका गायकवाड,श्रद्धा गायकवाड यांनी एकपात्री नाटिकेचे सुरेख सादरीकरण केले.दि.२६ मार्च २०२६ रोजी श्रीराम नवमी साजरी करण्यात आली.सर्वप्रथम श्रीराम प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून पुजन व वंदन करण्यात आले.सर्व कार्यक्रमाचे प्रास्ताविक, सुत्रसंचलन व आभार प्रदर्शन ग्रंथालयाचे आनंद भैय्या गायकवाड यांनी केले.

# जिल्हास्तरीय सामान्य ज्ञान स्पर्धेची तालुकास्तरीय परीक्षा उत्साहात संपन्न; विद्यार्थ्यांचा मोठ्या प्रमाणात सहभाग

**लोकनेता न्यूज नेटवर्क**

**बीड । विजय रोडे**





भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती, बीड शहर यांच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही महापुरुषांच्या जीवनकार्यावर आधारित जिल्हास्तरीय सामान्य ज्ञान स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेअंतर्गत तालुकास्तरीय परीक्षा सोमवार, दि. ३०. मार्च २०२६रोजी जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये उत्साहात पार पडली.तालुका बीडसाठी तुलसी संगणक महाविद्यालय येथे परीक्षा केंद्र निश्चित करण्यात आले होते. यावेळी आयु. मनोज वाघमारे, आयु. सुमेध जोगदंड, अशोक ठोकळ, तानाजी शिनगारे, अभिजीत जाधव आदींच्या प्रमुख उपस्थितीत उद्घाटन समारंभ संपन्न झाला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक प्रा. प्रकाश ढोकणे यांनी केले.

या स्पर्धेत जिल्हाभरातून सुमारे हजारो विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. विद्यार्थ्यांमध्ये वाचन संस्कृती रुजवणे तसेच चिकित्सक अभ्यासाची वृत्ती विकसित करणे हा या स्पर्धेचा मुख्य उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले.

स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी जिल्हा स्तरावर प्रा. शशिकांत जावळे, आयु. प्रणित सरवदे, आयु. सुमेध जोगदंड, प्राचार्य प्रदीप गाडे, आयु. भारत मगर, आयु. प्रवीण तरकसे, ड. राजेश शिंदे, आयु. महादेव इनकर, प्रा. अशोक गायकवाड यांनी उत्कृष्ट नियोजन केले.तसेच तालुका समन्वयकांच्या माध्यमातून सर्व तालुक्यांत परीक्षा सुरळीत पार पडली. यामध्ये शिरूर (अनिता लाटे, जयेंद्र निकम), आष्टी (प्राचार्य रत्नकांत निकाळजे, डॉ. चंद्रकांत साळवे), पाटोदा (प्राचार्य अस्मिता जावळे, पृथ्वीराज जावळे), वडवणी (बाबा जाधव, दीपक वडमारे), धारूर (रुद्र सर, सिरसाठ सर), परळी (गायकवाड सर), केज (दादा गायकवाड), माजलगाव (प्रमोद साळवे, अमोल राऊत), गेवराई (भारत मगर, सदाफुले) तसेच बीड (प्रा. प्रकाश ढोकणे) यांनी मोलाची भूमिका बजावली.तालुकास्तरावर निवड झालेल्या टॉप-१० विद्यार्थ्यांसाठी जिल्हास्तरीय अंतिम परीक्षा रविवार, दि. ५एप्रिल २०२६ रोजी तुलसी संगणक महाविद्यालय, बीड येथे आयोजित करण्यात आली आहे. पात्र विद्यार्थ्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# तुकूचीवाडी येथे खंडोबा मंदिर उभारणीचे मान्यवरांच्या हस्ते भूमिपूजन संपन्न



**लोकनेता न्यूज नेटवर्क**

**केज । प्रतिनिधी**

दि.३० मार्च २०२६ सोमवार रोजी केज तालुक्यातील तुकुचीवाडी येथे खंडोबा देवस्थानच्या मंदिराचे भूमिपूजन या भागाचे माजी जिल्हा परिषद सदस्य विजयकांत भैया मुंडे यांच्या शुभहस्ते व ह.भ.प.श्री.अर्जुन महाराज लाड गुरुजी यांच्या प्रमुख उपस्थितीत ग्रामस्थांन समवेत करण्यात आले. गावकऱ्यांनी लोक सहभागातून खंडोबा देवस्थान मंदिर उभारण्याचा पुढाकार घेतला असून तुकूचीवाडी गावात भव्य दिव्य असे मंदिर होणार असल्याने गावाच्या वैभवात भर पडणार असल्याने ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण तयार झाल्याचे दिसून आले.या वेळी गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# डिझेल,देशीदारु व कार सह ४ लाख २२ हजाराचा मुद्देमाल जप्त सहाय्यक पोलिस अधीक्षक व्यंकटराम यांच्या पथकाची धडाकेबाज कारवाई

**लोकनेता न्यूज नेटवर्क**

**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील जीवाचीवाडी ते तुकूचीवाडी या रस्त्या वरून सोमवार दि.३० मार्च रोजी मध्यरात्री साडे बारा वाजण्याच्या दरम्यान चार चाकी कार मधून ९० मिलीच्या ३०० देशी दारूच्या बाटल्याचे तीन बॉक्स,१२५ लिटर अवैध डिझेलची वाहतूक करणारी कार मिळून एकूण ४ लाख २२ हजार ४५० रुपयाचा मुद्देमाल केज पोलीस उप विभागाचे सहाय्यक पोलीस अधीक्षक व्यंकटराम यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांच्या पथकाने छापा मारून जप्त करून,आरोपी वाहन चालक अनंत नारायण चौरे रा.जीवाची वाडी याला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

सोमवारी रात्री उशिरा केज येथून तुकूचीवाडी येथे कार क्रमांक एम एच १२/ केवाय २१४८ मधून देशी दारूच्या बाटल्या व अवैध डिझेलची वाहतूक होत असल्याची माहिती, सहाय्यक पोलीस अधीक्षक व्यंकटराम यांना मिळाल्या वरून त्यांनी त्यांचे पथक पाठवून कारवाईचे आदेश दिले.जीवाचीवाडी ते तुकूचीवाडी या रस्त्यावर सोमवारी रात्री साडे बारा वाजण्याच्या दरम्यान जाणाऱ्या कार



क्रमांक एम एच १२ / २१४८ ची झडती घेतली असता या कारमध्ये ११ हजार ५०० रुपयाचे १२५ लिटर अवैध डिझेलचा साठा, १० हजार ९५०रुपयाच्या ९० मिलीच्या बॉबी या देशी दारूच्या ३०० बाटल्याचे ३ बॉक्स व कार मिळून एकूण ४ लाख २२ हजार ४५० रुपयाचा मुद्देमाल या कारवाईत जप्त करण्यात आला.ही कारवाई केज पोलीस उपविभागाचे सहाय्यक पोलीस अधीक्षक व्यंकटराम, यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक उमेश निकम,अमिरोद्दीन इनामदार,जावेद कराडकर,जमादार विकास चोपणे, बालासाहेब डापकर, पोलीस हवालदार राजू गुंजाळ,चंद्रकांत काळकुटे,अनिल मंदे, तांबारे,मुंडे,पोलीस अंमलदार टकले महिला पोलीस जाधव,व भालेराव यांनी केली. याप्रकरणी जमादार बालासाहेब डापकर यांच्या फिर्यादीवरून अनंत नारायण चौरे रा. जीवाचीवाडी याच्या विरुद्ध अवैध डिझेलचा साठा केल्याप्रकरणी व विना परवाना देशी दारूच्या बाटल्यांचा साठा केल्या प्रकरणी केज पोलिसात गून्हा नोंद झाला आहे.पुढील तपास पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या मार्गदर्शना खाली चालु आहे.

# सोमेश्वर साथीतुन जनतेसी नाती जोडणारे:संपादक बालासाहेबजी फड

लोकनेता न्यूज नेटवर्क


आज आपली घरं मुकी व्हायला लागली आहेत.घरात पूर्वीसारखा संवाद उरलेला नाही.बाप एका दरवाजावाटे घरात आला तर मुलगा दुसऱ्या दरवाजावाटे बाहेर जातो.घराची धर्मशाळा झाली आहे,घराचे रेस्ट हाऊस झाले आहे,घराची वेटींग रूम झाली आहे.माणसांचे नाते आता फेसबुक व व्हाट्सअप वरूनच जोपासल्या जात आहेत म्हणून एक कवी असे म्हणतो की

विज्ञानाच्या यूगात केवढी मोठी चूक श्र
आता रक्तांच्या ही नात्यांना लागते फेसबुक श्रश्र

नात्यात कृत्रिमता वाढत चालली असून अशा काळात नाते संबंध सांभाळने,जोपासने हे मोठे जिकीरीचे काम बनले आहे.अस्या ही काळात आपल्या कार्याशी प्रामाणिक राहून जनतेसी नाते जोडता येऊ शकते याचे उत्कृष्ट उदाहरण म्हणजे सोमेश्वर साथी हे वृतपत्राचे संपादक बालासाहेब फड होत.जे या वृत्तपत्राच्या माध्यमातून नाती जोडण्याचे व जपण्याचे प्रामाणिक काम करत आहेत.अस्या या नात्यांनी श्रीमंत असलेल्या संपादक बालासाहेब फड यांचा आज ०४ एप्रिल हा जन्मदिवस.त्यानिमित्ताने त्यांच्या जीवनचरित्राचा घेतलेला हा संक्षिप्त आढावा.

भारत हा विविधतेने नटलेला देश आहे.या देशाला फार प्राचीन परंपरा लाभलेली आहे.हा देश एकेकाळी सोने की चिडिया म्हणून ओळखला जात होता.येथे नालंदा,तक्षशिला सारखे विद्यापीठे होती. राजा स्वदेश पूजन्ते श्र विद्वान सर्वत्र पुजन्ते असा विचार प्रामुख्याने मांडला जात होता.नंतर या देशावर परकीयांनी आक्रमणे केली व या देशाला लुटले.त्यातच राजेशाहीचा जन्म झाला.छत्रपती शिवरायां सारखे मोजके राजे सोडले तर अनेक राजांनी जनतेची पिळवणूक केली.नंतर देशावर दीडशे वर्षे इंग्रजांनी राज्य केले.त्यांनी भारतीय जनतेचा अनन्वित छळ केला.अशातही काही सुधारणा ही आणल्या. तदनंतरच्या कार्यकाळात १५ ऑगस्ट १९४७ ला देशाला स्वातंत्र्य मिळाले पण लोकांची खरी प्रगती करावयाची असेल तर लोकशाही शिवाय पर्याय नाही हे लक्षात घेऊन येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर व अन्य विद्वानांनी संसदीय लोकशाहीचा स्वीकार केला.तीला बळकट बनविण्याचे काम हे प्रसारमाध्यमे करताहेत.आज प्रसार माध्यमात ही विविधता आली आहे.पण त्यात प्रिंट मिडीयाची प्रामाणिकता सर्वांपेक्षा अधिक आहे.





संपादक बालासाहेब फड यांचा जन्म ०४ एप्रील १९७४ रोजी आई गंगाबाई व वडिल सिताराम यांच्या पोटी बारा ज्योतिर्लिंगापैकी एक असलेल्या वैद्यनाथाच्या शेजारी असलेल्या कन्हेरवाडी ता.परळी जि.बीड येथे झाला.त्यांना बालपणापासुन प्रभू वैद्यनाथ व संत जगमित्र नागा, सोमेश्वर यांचा आशीर्वाद लाभला.घरात अनेक पिढ्यांपासून वारकरी संप्रदायाचे वातावरण असल्यामुळे कीर्तन,नामस्मरण व श्रवणभक्ती घडली व या अनुषंगाने चौफेर ज्ञान प्राप्त करता आले.ते स्वतः वारकरी संप्रदायाचे अनुयायी आहेत.सांप्रदायावर त्यांचा जीव आहे.त्यांनी आपल्या ह.भ.प. बालकिर्तनकार प्रकाश महाराज फड नावाच्या मुलाला वयाच्या सातव्या वर्षी ज्ञानाई गुरुकुल सेलू येथे वारकरी संप्रदायाचे शिक्षण घेण्यासाठी ठेवले. त्यांचे चिरंजीव या वयात अभ्यासू व उत्तम कीर्तन करतात.तसेच त्यांचे दुसरे चिरंजीव इंजीनियरिंग संग्राम बालासाहेब फड करत आहेत .या पुर्वी म्हटल्या प्रमाणे वृत्तपत्र व्यवसाय हा सतीचे वाण आहे.कारण या व्यवसायात बातमी लावताना हजारदा विचार करावा लागतो.बातमीची सत्यता असावी,स्पष्टता असावी,सदरक्षणाय खलनिग्रहणाय हे साध्य व्हावे. पद,पैसा,तोंड पाहून न लिहिता जे सत्य आहे ते लिहावे लागते.

तोफ मुकाबील हो तो अकबार निकालो श्र असे या साठीच म्हटले जाते.

ही सगळी वैशिष्ट्ये संपादकाला पाळावी लागतात.एखादी चुकीची बातमी लागली तर त्याची खूप मोठी किंमत संपादकाला सोसावी लागते हे एक प्रकारचे अग्निदिव्यच आहे. पण हे अग्निदिव्य संपादक बालासाहेब फड हे १९९५ पासून सांभाळत आहेत.त्यांनी साप्ताहिक परळी संदेश या पासून ते हे काम करत आहेत.ना कुठला या क्षेत्रातला वारसा ना भरगच्च पाठीमागे संपत्ती पण प्रामाणिकतेच्या जोरावर हे कार्य ते पार पाडताना दिसतात.संत तुकाराम महाराजांनी म्हटल्याप्रमाणे

असाध्य ते साध्य करिता सायास श्र

या न्यायाप्रमाणे त्यांनी ही असाध्य काम साध्य केले आहे.या साप्ताहिक काम करत करत २०१६ पासून सोमेश्वर साथी या दैनिकाचा प्रारंभ केला आहे.या दैनिकाच्या माध्यमातून त्यांनी अनेक नवोदितांना लेखन मंच उपलब्ध करून दिला आहे. अनेक क्षेत्रातील लोकांसी नाती जोडण्याचे काम करत आहेत.मी ही असाच जोडला गेलो म्हणुन त्यांच्या वाढदिवसाला लिहीण्याचा मोह होतो.आमचे अनेक लेख त्यांनी छापून आम्हाला लिहिते करण्याचे काम ते करतात.एवढेच नाही तर समाजात चांगुलपणा पेरण्याचं काम करणाऱ्या गुणवंतांचा या वृत्तपत्राच्या मार्फत वर्धापन दिनाला पुरस्कार देऊन सन्मानही करतात.चांगल्या कार्याला प्रबलन देण्याचं काम ते सतत करत आले आहेत.यासाठी स्वतःचे मन मोठे असावे लागते.जगाला ज्यांच्या कार्य कर्तुत्वाचा अभिमान वाटतो त्या शिवरायांच्या जन्मोत्सवाच्या निमित्ताने हा कार्यक्रम घडवून आणतात. त्याशिवाय अशा गोष्टी करता येत नाहीत.हेच यातून दिसून येते.

भले तरी देऊ कासेची लंगोटी श्र
नाठाळाचे माथी हाणू काठी श्र

ही भूमिका त्यांची दिसते.वारकरी संप्रदायाची प्रत्येक घडामोड आवर्जून आपल्या वृत्तपत्रात घेतात.

त्यांच्या अंतकरणात आपणास मदत करणा-यांबद्दल सतत कृतज्ञता दिसते.

.मा. श्री.किरण गित्ते साहेब ख-ड सचिव त्रिपुरा सरकार , विवेकानंद यूथ वेलफेअर सोसायटीच्या अध्यक्षा मा.सौ.उषाताई किरण गित्ते त्यांच्याप्रती ते नेहमी आभार व्यक्त करतात.वारकरी संप्रदायातील अनेक गायक,वादक,कीर्तनकार हे त्यांचे अत्यंत जवळचे मित्र आहेत. त्यांना आई-वडिलांचे आई गंगाबाई वडील सितारामजी यांचे सुरुवातीपासून सहकार्य लाभले. दोन भाऊ तसे दोन मुलांचे ही सहकार्य लाभत आले आहे. संपादक म्हटले की समाजसेवेसाठी खूप वेळ द्यावा लागतो अशा वेळेस घर सांभाळणारी व समजून घेणारी पत्नी महत्त्वाचे असते २००२ साली लग्न झाले तेव्हापासून मुलांची व परिवाराची सर्वाधिक काळजी त्यांच्या सौभाग्यवती सौ. ज्ञानेश्वरी बालासाहेब फड या घेत आहेत.त्यांच्या बद्दलही ते भरभरून सांगतात.वारकरी संप्रदायातील अनेक महाराज मंडळी वरती लेख ते नेहमीच आपल्या वृत्तपत्रात छापतात. महापुरुषांच्या व कार्यकर्तृत्व गाजवणाऱ्या राजकीय नेत्यांच्या वरती ही ते नेहमीच आपल्या वृत्तपत्रातून भरभरून लिहताना दिसतात.

त्यांच्या कार्याची दखल घेवुन त्यांची महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या परळी तालुकाध्यक्ष पदी निवड झाली.त्यांना आतापर्यंत अनेक पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे.ही पुरस्काराची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे.अस्या पत्रकारीतेसी प्रामाणीक राहुन नाते जोडणा-या व जपणा-या संपादक मा.बालासाहेब फड यांना आज वाढदिवसा निमित्त मनःपूर्वक शुभेच्छा देतो व त्यांच्याकडून भविष्यातही असेच नाते जोडण्याचे काम वृत्तपत्रीय माध्यमातुन घडत राहो अशी ईश्वर चरणी अपेक्षा व्यक्त करून त्यांना दीर्घ आयू आरोग्य चिंतुन मी माझे लेखन थांबवतो.

**-प्रा.डॉ.रामकृष्ण बदने**
**ग्रामीण महाविद्यालय,वसंतनगर**
**ता.मुखेड जि.नांदेड**
**भ्रमणध्वनी -९४२३४३७२१५**

# रामानंदाचार्य नरेंद्राचार्याजींच्या प्रबोधनातुन लाखो लोक झाले व्यसनमुक्त-ज.न.म.प्रवचनकार सौ.सिमाताई बर्डे

लोकनेता न्यूज नेटवर्क

**देगलूर । संतोष चिद्रावार लोणीकर**



हनुमान जयंती निमित्त २ एप्रिल रोजी सायंकाळी प्रवचनचा कार्यक्रम संपन्न झाला यावेळी प्रवचनात असे सांगितले की जगद्गुरु श्रीमंत रामानदांचार्य नरेंद्राचार्यजी यांच्या प्रेरणा व अमूल्य मार्गदर्शनामुळे लाखों लोकांनी व्यसनमुक्तीचा मार्ग स्वीकारला आहे.गेली पंचवीस वर्षे त्यांचे हे समाजोपयोगी कार्य अखंडपणे सुरू असून त्याचा व्यापक सकारात्मक परिणाम समाजावर होत आहे. गेल्या काही दशकांत विदेशी संस्कृतीच्या प्रभावामुळे व्यसनाधीतीचे प्रमाण वाढले आहे. विशेषतः तरूणाई व्यसनाच्या विळख्यात अडकून त्यांच्या वैयक्तिक व कौटुंबिक आयुष्यावर विपरित परिणाम होत आहे.या गंभीर परीस्थितीची जानीव होऊन जगद्गुरु रामानदांचार्य नरेंद्राचार्यजी यांनी व्यसनमुक्तीचे कार्य हाती घेतले. समाजाला दुर व्यसनापासून मुक्त करण्यासाठी त्यांनी सातत्याने प्रभावी उपक्रम राबवले असून त्यांचा लाभ हजारो कुटुंबांना झाला आहे. रामानंदाचार्य नरेंद्राचार्याजींच्या मार्गदर्शनामुळे व्यसनाधीन व्यक्तींना नवजीवन मिळत असून त्यांच्या संसारात पुन्हा आनंद फुलताना दिसत आहे. व्यसनमुक्तीच्या या चळवळीमुळे समाजात सकारात्मक बदल घडवून येत आहेत.तसेच प्रवचनात असे सांगितले की गुरु का करावा गुरु केल्यास काय होते व रक्तदान शिबीर, बंधारे, शिक्षण, असे अनेक प्रश्न माऊली सोडवतात असे सांगितले. यावेळी भजनी मंडळी धनगरवाडी यांच्या गायनाने लोणी ग्रामस्थ भावुक झाले. या कार्यक्रमास उपस्थित आनंद नरुचे, विजय कुमार बर्डे, हे होते कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी बालाजी गोटेवाड, शंकर कोयलवाड, माधवराव शिंदे, बालाजी विश्वकर्मा, दिलीप काळूचे, तानाजी टेलर, यांनी परिश्रम घेतले

# सातपुड्याचा 'कल्पवृक्ष' महु ठरतोय आदिवासींच्या जगण्याचा आधार; भर उन्हाळ्यात रोजगाराची सुवर्णसंधी!

लोकनेता न्यूज नेटवर्क

**मोलगी । प्रतिनिधी**

सातपुड्याच्या दुर्गम डोंगररांगांमध्ये सध्या कडक उन्हाचा कडाका जाणवत असला, तरी निसर्गाच्या कुशीत मात्र चैतन्याचा दरवळ पसरला आहे. सातपुड्याचा 'कल्पवृक्ष' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या महुच्या (मोह) फुलांचा हंगाम सुरू झाला असून, हा वृक्ष आदिवासी बांधवांसाठी खऱ्या अर्थाने 'संकटमोचक' ठरत आहे. उन्हाळ्याच्या दिवसात शेतीची कामे कमी असताना, महुच्या फुलांनी आदिवासी कुटुंबांना हक्काचा रोजगार उपलब्ध करून दिला आहे.चैत्र पौर्णिमेपासून महुची झाडे बहरण्यास सुरुवात झाली आहे. साधारण १५ ते २० दिवस चालणाऱ्या या हंगामात पहाटेपासूनच आदिवासी बांधव आबालवृद्धांसह रानावनात दाखल होताना दिसत आहेत. जमिनीवर पडलेली महुची फुले वेचण्यासाठी कुटुंबातील सर्व सदस्य उन्हाची पर्वा न करता मग्न असतात. एका झाडापासून दिवसाला साधारण १२ ते १५ किलो फुले मिळत असून, स्थानिक बाजारपेठेत व्यापाऱ्यांकडून ४५ ते ५० रुपये प्रति किलो दराने ही फुले खरेदी केली जात आहेत.

महुच्या फुलांकडे अनेकदा केवळ मद्यनिर्मितीचे साधन म्हणून पाहिले जाते, परंतु हा गैरसमज मोडीत काढणारे अनेक औषधी गुणधर्म समोर आले आहेत. महुच्या फुलांमध्ये कॅल्शियम आणि जीवनसत्त्वांचा मोठा साठा असून, गर्भवती व स्तनदा मातांसाठी हे एक उत्तम नैसर्गिक पोषक अन्न आहे.

आरोग्यदायी भाकरी, उसळ आणि चटणी. महुच्या बियांपासून (चिंचोडे) काढलेले तेल स्वयंपाकासाठी अत्यंत उपयुक्त.

सातपुड्यातील वृद्ध नागरिक सांगतात की, १९७१ च्या भीषण दुष्काळात जेव्हा अन्नाचा मोठा तुटवडा होता, तेव्हा याच महुच्या फुलांच्या भाजीने आदिवासी बांधवांचे प्राण वाचवले होते. आजही हा वृक्ष केवळ आर्थिक उत्पन्नाचे साधन नसून सातपुड्याच्या संस्कृतीचा अविभाज्य भाग आहे.

महुच्या फुलांपासून अनेक खाद्यपदार्थ बनवता येतात. जर या भागात महु प्रक्रिया उद्योग सुरू झाला, तर आदिवासी बांधवांना केवळ कच्चा माल विकण्याची गरज पडणार नाही. त्यापासून मूल्यवर्धित उत्पादने तयार झाल्यास आदिवासींच्या उत्पन्नात मोठी वाढ होऊन त्यांचे जीवनमान उंचावेल.

असे डीरा

कविराज उमटी (तालुका अक्कलकुवा) हे सांगतात.राज्य सरकारने महु फुलांवरील निर्बंध हटवल्याने आता आदिवासी बांधवांना मोकळा श्वास घेता येत आहे. सातपुड्यातील हा मौल्यवान वारसा जपण्यासाठी आणि त्याद्वारे आर्थिक क्रांती घडवण्यासाठी महुच्या वृक्षांचे संवर्धन करणे ही काळाची गरज आहे. हा कल्पवृक्ष सातपुड्यातील बांधवांच्या कष्टाला आता सोन्याची झळाळी मिळवून देणार, यात शंका नाही.

# बोरगडीला तीर्थक्षेत्र 'गट ब' दर्जा लवकरच मिळवून देणार-आ.बाबुराव कदम कोहळीकर

## हनुमान जन्मोत्सव उत्साहात; हजारो भाविकांची दर्शनासाठी गर्दी

लोकनेता न्यूज नेटवर्क

**हिमायतनगर । लक्ष्मण शेन्नेवाड**

तालुक्यातील मौजे बोरगडी येथे श्री पवनसूत हनुमान जन्मोत्सव व अखंड हरिनाम सप्ताह सोहळा अत्यंत भक्तिभावपूर्ण आणि उत्साहात संपन्न झाला. या सोहळ्यासाठी हजारो भाविकांनी मोठ्या श्रद्धेने हजेरी लावून दर्शनाचा लाभ घेतला. संपूर्ण परिसर 'जय हनुमान'च्या गजराने आणि हरिनामाच्या अखंड ध्वनीने दुमदुमून गेला होता.या प्रसंगी उपस्थितांना संबोधित करताना हदगांव हिमायतनगर विधानसभेचे आमदार बाबुराव कदम कोहळीकर यांनी बोरगडीला तीर्थक्षेत्र 'गट ब' दर्जा मिळवून देण्यासाठी शासन दरबारी ठोस प्रयत्न करणार असल्याचे स्पष्ट करत, हा दर्जा मिळवून देण्याचा निर्धार व्यक्त केला. येथील पवनसूत हनुमान मंदिर हे नवसाला पावणारे जागृत देवस्थान असून, अनेक दशकांपासून हजारो भाविक येथे मोठ्या श्रद्धेने येतात. आपल्या मनोकामना पूर्ण झाल्यानंतर भाविक येथे हनुमान जयंतीच्या दिवशी आपला नवस फेडतात. अशा या पवित्र आणि श्रद्धास्थान असलेल्या मंदिराचा दर्जा वाढवणे हे पावित्र कार्य मी करणार आहे, असे त्यांनी ठामपणे सांगितले.यावेळी त्यांनी बोरगडी या तीर्थक्षेत्राच्या नावाची हिमायतनगर शहरातील शासकीय विश्रामगृहाच्या बाजूने जाणाऱ्या बोरगडी रोड वर श्री हनुमान बोरगडी देवस्थान अशी भव्य कमान उभारण्याचाही मानस व्यक्त केला. या उपक्रमामुळे बोरगडीचे धार्मिक महत्त्व राष्ट्रीय महामार्गाने जाणाऱ्या नागरिकांमध्ये अधिक अधोरेखित होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. व बोरगडी गावाला संतपरंपरेचा समृद्ध वारसा लाभलेला आहे. वै.बाबा महाराज सातारकर यांचे असंख्य शिष्य या परिसरात असून, ह.भ.प. माधव महाराज बोरगडीकर हे प्रसिद्ध कीर्तनकार या भागातुन ओळखले जातात. ह भ प माधव महाराज बोरगडीकर त्यांच्या कीर्तनातून तालुक्यात सह जिल्ह्यात समाजप्रबोधनाची परंपरा सातत्याने जोपासली जात आहे.याशिवाय बोरगडी येथील विवाह सोहळ्याची परंपरा व वेळेवर विवाह मुहूर्त लावण्याची आख्यायिका जिल्ह्यात नाहीतर महाराष्ट्रात नावलौकिक आहे जिल्ह्यात शिस्त व परंपरेची जोपासना करणारे गाव म्हणून व तसेच गावातील असंख्य नवतरुणांमध्ये कुस्ती या राष्ट्रीय खेळाची विशेष आवड असून, येथे महिला मल्लांचाही सहभाग लक्षणीय आहे. दररोज पहाटेपासून आखाड्यात शेकडो तरुण मल्ल सराव करताना दिसतात. क्रीडा क्षेत्रातही बोरगडी आपली वेगळी ओळख निर्माण करत आहे.दरवर्षी आयोजित होणारा हरीनाम सप्ताह हा या गावाचा प्रमुख आध्यात्मिक सोहळा असून, त्याला महाराष्ट्रासह आंध्रप्रदेश व तेलंगणा राज्यातूनही मोठ्या संख्येने भाविक उपस्थित राहतात. त्यामुळे बोरगडीला धार्मिक, सामाजिक, शैक्षणिक आणि क्रीडा क्षेत्रात तालुक्यात अग्रस्थान मिळाले आहे.एकंदरीत, नवसाला पावणारे पवित्र हनुमान मंदिर, संतपरंपरेचा वारसा, क्रीडाप्रेमी तरुणाई आणि भक्तिभावाने नटलेले वातावरण यामुळे बोरगडी गावाची ओळख दिवसेंदिवस अधिक बळकट होत असून, तीर्थक्षेत्र 'गट ब' दर्जा मिळाल्यास या गावाच्या विकासाला नवे आयाम मिळतील, अशी अपेक्षा आमदार बाबुराव कदम कोहळीकर यांनी व्यक्त केली आहे. यावेळी शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख राजू पाटील, विजय वळसे,तालुकाप्रमुख रामभाऊ ठाकरे,नगरसेवक सुभाष बल्पेलवार,संतोष मुद्देवाड,नाथा पाटील,उ.बाटा गटाच्या शिवसेनेचे तालुकाप्रमुख संजय काईतवाड, साईनाथ कट्टावार,शाम येणेकर पै.निलेश शेनेवाड, माधव काईतवाड, शंकर पळशीकर, यांच्यासह असंख्य वारकरी ग्रामस्थ,पत्रकार व ज्येष्ठ नागरिक महिला व भजनी मंडळी या सोहळ्यास मोठ्या संख्येने उपस्थित होते.




**पतित पावन श्री क्षेत्र हनुमान मंदिर बोरगडीला तीर्थक्षेत्र 'गट ब' दर्जा मिळवून देण्यासाठी शासन दरबारी ठोस प्रयत्न करणार असुन हा दर्जा मिळवून देण्याचा माझा निर्धार आहे . येथील पवनसूत हनुमान मंदिर हे नवसाला पावणारे जागृत देवस्थान असून, अनेक दशकांपासून हजारो भाविक येथे मोठ्या श्रद्धेने येतात. आपल्या मनोकामना पूर्ण झाल्यानंतर भाविक नवस फेडतात. अशा या पवित्र आणि श्रद्धास्थान असलेल्या मंदिराचा दर्जा वाढवणे हे पावित्र कार्य मी करणार आहे. येथील भौतिक सुविधा, बांधकाम आणि पाणी हे विषय अतिशय महत्वाचे असून त्या करिता सुद्धा लवकरच ५० लाख रुपयांच्या निधीचा मी पाठपुरावा करून पुढील वर्षा पर्यत नक्कीच हे करण्याचा आमचा मानस आहे. हणमंतराया हे सत्कर्म माझ्या हातून करून घेत आहेत हे माझं सदभाग्य समजतो असे म्हणत त्यांनी उपस्थित सर्वांना हनुमान जयंतीच्या शुभेच्छा दिल्या...**

**आ. बाबूराव कदम कोहळीकर....**

# बीड जिल्ह्यातील अनेक कोंडलेल्या नद्या घेताहेत मोकळा श्वास

## मयंक गांधी हे शेतकऱ्याच्या जीवनातील जलक्रांतीचा महानायक

लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । विजय रोडे**

नदी केवळ पाणी वाहून नेणारा प्रवाह नसून ती ग्रामीण अर्थव्यवस्थेची जीवनवाहिनी आहे, हे ओळखून दुष्काळाच्या छायेतून मुक्त होऊन शाश्वत पाणी साठवणुकीकडे वाटचाल करण्यासाठी परळी, अंबाजोगाई आणि धारूर तालुक्यात सध्या - जलसंधारणाचे अभूतपूर्व काम सुरू आहे. या तालुक्यातुन वाहणाऱ्या पापनाशी, गुणवारा, वान आणि सरस्वती अशा अनेक नद्यांसह त्यांच्या उपनद्यांचे - खोलीकरण, रुंदीकरण आणि पाणी पुनर्भरण या वैज्ञानिक तंत्रज्ञानाचा वापर करून भूगर्भातील पाणीपातळी वाढवण्याचा निर्धार - जलपुरुष मयंक गांधी यांच्या मार्गदर्शनाखाली ग्लोबल विकास ट्रस्ट मार्फत राबविण्यात येत असून याचे काम वेगाने सुरू आहे. महाराष्ट्रातील मराठवाडा विशेषतः बीड जिल्हा हा सातत्याने दुष्काळाच्या सावटा मध्ये येतोय. कधी अवर्षण तर कधी अतिवृष्टी आणि त्यामध्ये न अवकाळी व बिगर मोसमी पाऊस यामुळे



जिल्ह्यातील कृषी क्षेत्र पुर्णतः उद्धवस्त झाले आहे. कृषी, उद्योग आणि पिण्याच्या पाण्यासाठी मोठ्या - प्रमाणावर भूगर्भातील पाण्याचा उपसा होत असल्याने जिल्ह्यातील पाणी पातळीत कमालीची घट झाली आहे. सातत्याने दुष्काळाच्या दुष्टचरकात अडकलेल्या बीड जिल्ह्यातील खरीप आणि रब्बी हंगामावर विपरीत परिणाम तर होतोच याच सोबत जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न, पिण्यायोग्य पाण्याचा प्रश्न, उद्योगधंदे हा प्रश्न ही बिकट बनला आहे. निसर्गाच्या या अवकृपेने जिल्ह्यातील बळीराजा पूर्णपणे उध्वस्त होऊन आत्महत्या करण्याचे टोकाचे पाऊल घेत आहे. देशात सर्वाधिक शेतकरी आत्महत्या नोंद ही बीड जिल्हयात झालेली असून या सर्व विदारक परिस्थितीत जिल्ह्याचा आणि शेतकयांच्या जीवनात सुबकता आणण्याचा निर्धार मयंक गांधी यांनी केला. मयंकगांधी यांच्या दूरदृष्टीतुन ग्लोबल विकास ट्रस्ट हे मागील काही वर्षापासून परळी, अंबाजोगाई, धारूर सह इतर तालुक्यातील शेतकऱ्यांच्या जीवनात जल क्रांती आणण्याचे काम करत आहे. आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या मुला-मुलींचे विवाह सोहळ्याचे आयोजन करणे, अतिवृष्टीग्रस्त भागातील अनेक गावातील ६ हजारापेक्षा अधिक बाधित कुटूंबियांना जीवनावश्यक साहित्य आणि रेशन पुरवठा करून त्यांना मदत करणे, अत्याधुनिक शेती तंत्रज्ञान याची शास्त्रशुद्ध माहिती व प्रशिक्षण देणे यासह अनेक कामे ग्लोबल विकास ट्रस्ट मार्फत करण्यात येत आहेत. शेतकऱ्यांच्या जीवनात परिवर्तन घडवून आणायचे असेल तर शाश्वत शेती हे एकमेव साधन असल्याचे ओळखून शेतीला कायमस्वरूपी सिंचनाची सोय व्हावी, पडलेल्या पावसाचा थेंब न थेंब वाया न जाता त्याचे सर्वधन व्हावे यासाठी परळी, अंबाजोगाई, धारूर तालुक्यातील प्रमुख जलवाहिनी असलेल्या वाण, पापणाशी, गुणवरा आणि सरस्वती या नद्या, त्यांच्या उपनद्या आणि तालुक्यात वाहणारी मोठी ओढी त्यामधून लाखो लिटर पावसाचे पाणी वाहून जाते. नद्यांमध्ये झालेल्या अतिक्रमण अडथळ्यामुळे नदी मधून वाहून जाणारे पाणी पात्राबाहेर येऊन नदी शेजारील शेतीचे होणारे मोठे नुकसान याचा अभ्यास करून मान्सुन पूर्व काळात या शास्त्रशुद्ध पद्धतीने नद्यांचे पुनर्जीवन आणि खोलीकरण काम ग्लोबल विकास ट्रस्ट च्या मार्फत वेगाने सुरू आहे. केवळ पाणी अडवून चालणार नाही, तर ते जमिनीत मुरवणे आवश्यक आहे, हे ओळखून या प्रकल्पात अधिकाधिक उभारले जात आहेत. या वैज्ञानिक तंत्रज्ञानाचा वापराने नदी क्षेत्रातील असंख्य गावातील पाणी पातळीत लक्षणीय वाढ होणार आहे. या सर्व कामामुळे शाश्वत सिंचनाची सोय होऊन या तालुक्यातील शेतकऱ्यांच्या जीवनात क्रांती घडणार आहे.

## ४० वर्षांचा अन्याय संपला! नेता नाही, बेटा आहे म्हणत सुरज पांडे यांची आक्रमक कामगिरी

लोकनेता न्यूज नेटवर्क

**चंद्रपूर । सिध्देश्वर केंद्रे**

प्रभाग क्र. १० मधील बंगाली कॅम्प परिसरात तब्बल ४० वर्षांपासून पाणी, वीज आणि घरांच्या मूलभूत सुविधांपासून वंचित असलेल्या नागरिकांचा प्रश्न अखेर मार्गी लागला असून, संपूर्ण परिसरात समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.वर्षानुवर्षे अनेक नगरसेवक आले, निवडणुका झाल्या, आश्वासने दिली गेली, मात्र हा ज्वलंत प्रश्न कायमच दुर्लक्षित राहिला. पण यंदा जनतेने सुरज पांडे यांच्यावर विश्वास ठेवत त्यांना प्रचंड बहुमताने निवडून दिले आणि याच विश्वासाला न्याय देत त्यांनी थेट कामाला सुरुवात केली.



निवडणुकीदरम्यान मी नेता नाही, तुमचा बेटा आहे असे म्हणत दिलेले आश्वासन त्यांनी कृतीत उतरवले. तुमच्या समस्या माझ्या समस्या आहेत आणि त्या सोडवणे ही माझी जबाबदारी आहे, या भूमिकेतून त्यांनी प्रशासनाकडे पाठपुरावा करत हा प्रश्न मार्गी लावला.

आज बंगाली कॅम्पमध्ये पाणी, वीज आणि निवाऱ्याच्या सुविधांचा मार्ग मोकळा झाल्याने नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण असून, अनेकांनी नगरसेवक पांडे यांचे आभार व्यक्त केले आहेत. जनतेच्या प्रश्नांसाठी आक्रमक भूमिका घेणारा लोकप्रतिनिधी कसा असावा, याचे उदाहरण म्हणजे सुरज पांडे, अशी चर्चा सध्या गडचांदूर शहरात रंगली आहे.

## वाचन संस्कृती जतन करणे ही काळाची गरज-डॉ.चंद्रसेन कोठावळे

लोकनेता न्यूज नेटवर्क

**पाचोड । त्रिसिंग जायभाये**

: येथील शिवछत्रपती कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय तथा मराठी विभागाच्या वतीने 'आंतरराष्ट्रीय बाल पुस्तक दिन' आणि 'छत्रपती राजश्री शाहू महाराज राज्याभिषेक दिन' उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात शाहू महाराजांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून करण्यात आली.या कार्यक्रमाला जि.प. शाळेचे मुख्याध्यापक रेवनसिंग शिखरे , सोनार सर, पाटील सर यांची प्रमुख उपस्थिती लाभली होती. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रसेन कोठावळे होते. विशेष म्हणजे या उपक्रमासाठी जि.प. शाळेतील सुमारे १०० बालविद्यार्थ्यांना निमंत्रित करण्यात आले होते. प्रमुख पाहुणे मुख्याध्यापक शिखरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, पुस्तकं आपल्याला नवीन जग दाखवतात.विचार करायला शिकवतात. आणि चांगले संस्कार



घडवतात. म्हणून पुस्तकं हे आपले चांगले मित्र आहेत. महाविद्यालयाच्या वतीने उपस्थित विद्यार्थ्यांना विविध थोर व्यक्तिमत्त्वांच्या जीवनकथांवर आधारित प्रेरणादायी पुस्तकांचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी, हा मुख्य उद्देश होता.मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. चंद्रसेन कोठावळे यांनी सांगितले की, आजच्या आधुनिक युगात वाचन संस्कृती हळूहळू लोप पावत चालली आहे. मोबाईल आणि ऑनलाइन गेम्सच्या आहारी गेलेला विद्यार्थी वाचनापासून दूर जात आहे. ही परिस्थिती बदलण्यासाठी वाचन संस्कृतीचे जतन करणे अत्यंत गरजेचे आहे. विद्यार्थ्यांनी मैदानी खेळांना प्राधान्य द्यावे आणि पुस्तकांच्या सहवासातून आपले व्यक्तिमत्त्व घडवावे.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. विनोद कांबळे यांनी केले, तर आभार प्रा. संदीप सातोणकर यांनी मानले. याप्रसंगी महाविद्यालयातील उपप्राचार्य डॉ.शिवाजी यादव डॉ.सुभाष पोटभरे डॉ.सुरेश नलावडे डॉ.हेमंत कुमार जैन डॉ.तुकाराम गावंडे डॉ.उत्तम जाधव प्रा. सचिन कदम प्रा.नितीन चित्ते डॉ.विठ्ठल देखणे व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते

## चांदूरबाजार पाटबंधारे कार्यालयात कर्मचारी गायब! शेतकऱ्यांची कामे रखडली; प्रशासन झोपेत?

लोकनेता न्यूज नेटवर्क

**चांदूरबाजार । प्रतिनिधी**

उपविभागीय अभियंता, मध्यम व लघु पाटबंधारे विभाग क्रमांक ३, चांदूरबाजार येथील कार्यालयाचा भोंगळ कारभार पुन्हा एकदा समोर आला आहे. शासनाने ठरवून दिलेल्या वेळेत कार्यालय सुरू असतानाही येथे एकही कर्मचारी हजर नसल्याचे धक्कादायक वास्तव उघड झाले आहे.आमच्या प्रतिनिधींनी प्रत्यक्ष कार्यालयाला भेट दिली असता संपूर्ण कार्यालय ओस पडलेले आढळले. कोणताही अधिकारी किंवा कर्मचारी उपस्थित नसल्याने कामानिमित्त आलेल्या शेतकरी व नागरिकांना निराश होऊन उलट्या पावली परत जावे लागले. परिणामी, शेतकऱ्यांची विविध कामे प्रलंबित राहून त्यांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. विशेष म्हणजे, संबंधित अधिकाऱ्यांवर वरिष्ठांचा कोणताही दबाव नसल्याने कार्यालयात मनमानी कारभार सुरू असल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे. शासनाचे नियम व वेळापत्रक अक्षरशः धाब्यावर



बसवण्यात आले असून प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे सर्वसामान्य नागरिकांचे हाल होत आहेत.या प्रकारामुळे संतप्त झालेल्या शेतकरी व नागरिकांनी जिल्हाधिकारी याकडे गांभीर्याने लक्ष देणार का? असा सवाल उपस्थित केला आहे. संबंधित विभागाच्या कारभाराची तातडीने चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी जोर धरत आहे.

## तामसा येथील दुकानदाराची हदगावातील एका पत्रकार प्रतिनिधीवर कार्यवाही करण्याची धमकी

### तालुक्यातील पत्रकारांचे शिष्टमंडळ शासनाकडे चौकशी आणि कायदेशीर कार्यवाहीची मागणी करणार?

लोकनेता न्यूज नेटवर्क

**हदगांव । चंद्रकांत भोरे**

हदगाव तालुक्यातील मोठी बाजारपेठ असलेल्या तामसा शहरातील एका किराणा दुकानदार किराणा दुकानाच्या आडोशाने गोवा, रजनीगंधा, विमल, मुसाफिर, ह्या शासनाने बंदी घातलेल्या सुगंधी गुटख्याची ठोक आणि किरकोळ विक्री व तस्करी करीत असल्याची चर्चा तामसा शहर आणि परिसरात होत असताना हदगाव येथील एका पत्रकार प्रतिनिधीने सदरील घुटका तस्करीची चर्चा हेरून आपल्या लोकप्रियदैनिकात गुटखा किंग तस्करी बद्दलचे (वृत्त) बातमी प्रकाशित केली सदरील खऱ्या बातमीचा राग मनात धरून दुकानदाराने ९५०३७५३८७२ ह्या मोबाईल क्रमांकावरून दिनांक १ एप्रिल २०२६ रोजी रात्री आठ वाजून दोन मिनिटांनी हादगाव येथील खरी बातमी प्रकाशित करणाऱ्या एका पत्रकार प्रतिनिधीच्या ९७६५६५६८७६ ह्या नंबरवर खोटी कारवाई करण्याची धमकी देऊन पत्रकार क्षेत्राची गळचेपी करण्याचा प्रयत्न केला असून सदरील दुकानदाराची चौकशी होऊन हदगाव तालुक्यातील पत्रकार प्रतिनिधीचे शिष्टमंडळ शासनाकडे कायदेशीर कार्यवाहीची मागणी करणार असल्याची चर्चा हादगाव तालुक्यातील पत्रकार प्रतिनिधी मध्ये जोर धरीत आहे.

## उन्हाची तीव्रता वाढल्याने माठांची विक्री वाढली

### माठांना मागणी; गरिबांचा फ्रिजही महागला

लोकनेता न्यूज नेटवर्क

**किनवट । शेख शौकत**

किनवट बाजार सध्या उन्हाची तीव्रता वाढल्याने गरीबांचा फ्रिज समजल्या जाणाऱ्या मातीचे माठ, मटके आणि रांजण बाजारात विक्रीसाठी दाखल झाले आहेत. गेल्या रविवारच्या आठवडी बाजार व आज शुक्रवार किनवट शहराच्या रस्त्यावर लहान-मोठ्या आकारांतील काळे, लाल माठ व रांजण विक्रीस आले आहेत.

फ्रिजरमध्ये थंड केलेल्या पाण्यापेक्षा मातीच्या भांड्यातील पाणी आरोग्यासाठी गुणकारी असते. त्यामुळे आजही अनेक नागरिक मातीच्या भांड्यातील

पाण्याचा प्रामुख्याने वापर करतात. यावर्षी मार्च महिन्याच्या पहिल्याच आठवड्यापासून



सूर्य आग ओकू लागला आहे. दिवसेंदिवस तापमानात वाढ होत आहे.

उन्हामुळे पारंपरिक मातीचे माठ, रांजण, यांना मागणी वाढली

आहे. किनवट शहरात माठ विक्रीसाठी विक्रेत दाखल दाखल झालेआहेत. ग्राहकांची या माठांना पसंतीदेखील असल्याचे दिसून येत आहे. माठासाठी लागणाऱ्या कच्च्या मालाच्या किंमतीत वाढ झाल्याचे माठ विक्रेत्यांनी सांगितले आहे.

### घाटशीळ पारगावहून बडेवाडीकडे दिमाखात मिरवणूक

## संत भगवानबाबा नारळी सप्ताहानिमित्त १० क्किंटल लाडूंची महापंगत उत्साहात

लोकनेता न्यूज नेटवर्क

**बाळासाहेब खेडकर । पाथर्डी**

घाटशीळ पारगाव ता. शिरूर कासार, जि. बीड येथील ग्रामस्थांच्या वतीने बडेवाडी येथे सुरू असलेल्या श्री संत भगवानबाबा नारळी सप्ताहानिमित्त आज दहा क्विंटल लाडूंची भव्य महापंगत मोठ्या उत्साहात पार पडली. यानिमित्त घाटशीळ पारगाव ते बडेवाडी अशी भव्य मिरवणूक काढण्यात आली असून हजारो ग्रामस्थांच्या उपस्थितीत हा सोहळा दिमाखात संपन्न झाला.सकाळपासूनच गावात धार्मिक उत्साहाचे वातावरण होते. पारंपरिक वाद्यांच्या गजरात, भगवे फेटे व दुपट्टे परिधान करून ग्रामस्थांनी मोठ्या श्रद्धेने सहभाग नोंदविला. मिरवणुकीदरम्यान जयघोष, ढोल-ताशांच्या निनादात वातावरण भक्तिमय झाले होते. ग्रामस्थांनी एकोप्याने आणि भक्तिभावाने लाडू



तयार करून ते सप्ताहस्थळी अर्पण केले.बडेवाडी येथे पोहोचलेल्या मिरवणुकीचे मोठ्या जल्लोषात स्वागत करण्यात आले. बडेवाडी ग्रामस्थांच्या वतीने रामगिरी महाराज यांनी घाटशीळ पारगाव ग्रामस्थांचे भव्य स्वागत केले. यावेळी दोन्ही गावांतील ग्रामस्थांमध्ये उत्साहाचे आणि भक्तिभावाचे वातावरण पाहायला मिळाले.यानंतर संत भगवानबाबांच्या चरणी लाडूंचा नैवेद्य अर्पण करून महापंगतीचे आयोजन करण्यात आले. हजारो भाविकांनी या महापंगतीचा लाभ घेतला.या कार्यक्रमासाठी गावातील तरुण, ज्येष्ठ मंडळी तसेच महिला वर्गाने मोठ्या उत्साहाने परिश्रम घेतले. ग्रामस्थांच्या एकजुटीचे आणि भक्तिभावाचे दर्शन या सोहळ्यात घडून आले. हा सोहळा अधिक भव्यदिव्य व्हावा अशी भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली.या भव्य आयोजनामुळे परिसरात भक्तिमय आणि उत्सवी वातावरण निर्माण झाले असून संत भगवानबाबा नारळी सप्ताह अधिक रंगतदार ठरत आहे.

# नागरिकांच्या दीर्घ प्रतीक्षेला पूर्णविराम:अंबेवेस येथे नव्या पुलाच्या बांधकामास ज्येष्ठ नागरिक यांच्या हस्ते प्रारंभ

लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । विजय रोडे**

जुन्या गावभातील महत्त्वाचा वाहतूक दुवा असलेला पुल आता पुनर्निर्माण होणार आहे. अंबेवेस परिसरातील नागरिकांच्या अनेक वर्षांच्या मागणीला अखेर मूर्त स्वरूप प्राप्त झाले असून, नव्या पुलाच्या बांधकामाचा शुभारंभ आज या भागातील जेष्ठ नागरिक यांच्या हस्ते करण्यात आला. जनतेचे प्रतिनिधी म्हणून ज्येष्ठ नेते नारायणदेव गोपनपाळे यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून शुभारंभ झाला.जुन्या व अरुंद नळकांडी पुलामुळे नागरिकांना दररोज मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. विशेषतः पावसाळ्यात परिस्थिती अधिकच गंभीर होत असल्याने शालेय विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, महिला व शेतकरी यांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. नवीन, प्रशस्त व सुरक्षित पुलासाठी नागरिकांकडून सातत्याने मागणी होत होती. या मागणीची दखल घेत राज्याचे माजी मंत्री आ. धनंजय मुंडे तसेच राज्याच्या पर्यावरण व






पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या प्रयत्नांमुळे सन २०२५-२६ च्या वार्षिक जिल्हा योजना (DPDC) अंतर्गत या पुलासाठी १ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला.आज या पुलाच्या बांधकामाचा शुभारंभ या भागातील जेष्ठ व मान्यवर नागरिक यांच्या हस्ते श्रीफळ फोडून करण्यात आला. या कार्यक्रमास परिसरातील ज्येष्ठ नागरिकांसह अनेक मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. या प्रसंगी माजी नगराध्यक्ष बाजीराव धर्माधिकारी, नगर परिषद बांधकाम सभापती प्रा. पवन मुंडे, माजी उपनगराध्यक्ष तथा नगरसेवक राजाभैय्या पांडे, जयराज देशमुख, नितीन बागवाले आदी उपस्थित होते.दरम्यान, पुलाचे काम दर्जेदार व वेळेत पूर्ण व्हावे यासाठी प्रशासनाला सूचना देण्यात आल्या. तसेच कामात पारदर्शकता राखण्यासाठी पुलाचे थ्री-डी स्टील डिझाईन, मंजूर निधी व कामाचा कालावधी दर्शविणारा माहिती फलक उभारण्याचे निर्देशही नगर अभियंत्यांना देण्यात आले आहेत. नव्या पुलामुळे अंबेवेस परिसरातील वाहतूक अधिक सुरक्षित व सुलभ होणार असून, हा पूल विकासाचा नवा दुवा ठरणार असल्याची भावना नागरिकांकडून व्यक्त होत आहे.पुलाचे काम दर्जेदार व वेळेत पूर्ण व्हावे यासाठी नगर परिषद प्रयत्न करेल.अशी ग्वाही नगराध्यक्षा सौ पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी व सर्व न. प. पदाधिकारी यांनी दिली आहे.

**नागरिकांनी पर्यायी रस्त्यांचा वापर करण्याचे आवाहन**

दरम्यान अंबेवेस येथील पूलाला आता नवे रूप येणार असून नवीन पूलाच्या बांधकामासाठी या पुलावरून वाहतूक बंद राहणार आहे. त्यामुळे या पुलाच्या दोन्ही बाजूने असलेल्या पर्यायी रस्त्यांचा उपयोग नागरिकांनी बांधकाम पूर्ण होण्याच्या कालावधीत करावा व नगरपरिषदेला सहकार्य करावे असे आवाहन करण्यात आले आहे

## हानेगाव येथून जवळ असलेल्या मुनेगाव येथे हनुमान जयंती उत्साहात साजरी





लोकनेता न्यूज नेटवर्क

**देगलूर । संतोष चिद्रावार लोणीकर**

दरवर्षी प्रमाणे याही वर्षी मुनेगाव येथे हनुमान जयंती निमित्त धार्मिक व सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन करून उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला आहेत.

या मंदिराच्या भोवती रांगोळी काढून रोषणाई करण्यात आली व महाप्रसाद वाटप करण्यात आले हे मंदिर तीन राज्यांच्या सीमेवर असल्यामुळे भाविकांची गर्दी वाढली होती.

येथे दरवर्षी हजारो भाविक येतात आणि म्हणतात नवसाला पावणारा मारूती असे सांगतात येथील पुजारी श्री कोंडीबा शेरीकार हे आहेत पुरातन काळापासून मंदिर आहे असे भाविक सांगत आहेत.या परिसरात लोणी, हनेगाव,व सर्व ग्रामीण भागात हनुमान जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

## भगवानगड परिसरात अवकाळी पाऊस व गारपिटीचा तडाखा; पिकांचे मोठे नुकसान,तात्काळ पंचनाम्याची मागणी

लोकनेता न्यूज नेटवर्क

**बाळासाहेब खेडकर । पाथर्डी**



भगवानगड परिसरात नुकत्याच झालेल्या अवकाळी पाऊस व गारपिटीमुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या अनियमित हवामानामुळे बाजरी, गहू, मका आणि कांदा यांसारख्या उभ्या पिकांना मोठा फटका बसला असून अनेक ठिकाणी पिके आडवी पडून पूर्णतः नष्ट झाली आहेत.मालेवाडी येथील माजी सरपंच सौ.चंद्रकला पांडुरंग खेडकर यांनी शासनाकडे तात्काळ लक्ष देण्याची मागणी केली आहे. अचानक झालेल्या गारपिटीमुळे शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावला गेला आहे. प्रशासनाने विलंब न करता त्वरित पंचनामे करून नुकसान भरपाई जाहीर करावी, अशी मागणी त्यांनी केली.परिसरातील शेतकरी आधीच आर्थिक अडचणीत असताना या अवकाळी संकटामुळे त्यांची परिस्थिती अधिकच बिकट झाली आहे. अनेक शेतकऱ्यांनी कर्ज काढून पिकांची लागवड केली होती. मात्र, गारपिटीमुळे संपूर्ण पीक जमीनदोस्त झाल्याने त्यांच्यावर दुहेरी संकट कोसळले आहे. शासनाने तातडीने सर्वेक्षण पथके पाठवून नुकसानग्रस्त भागाचा पंचनामा करावा व शेतकऱ्यांना त्वरित आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे. अन्यथा आंदोलनाचा इशारा देखील देण्यात येत आहे.

## श्री छत्रपती शिवाजी महाराज उद्यानाचे सुशोभीकरण करून सुरळीत चालू ठेवा–धनाजी जोशी



लोकनेता न्यूज नेटवर्क

**देगलूर । संतोष चिद्रावार लोणीकर**

देगलूर शहरातील एकमेव असलेले श्री छत्रपती शिवाजी महाराज उद्यानाचे सुशोभीकरण करण्यासंदर्भात देगलुर नगर परिषदेच्या मुख्याधिकारी निलम कांबळे यांची सामाजिक कार्यकर्ते धनाजी जोशी यांनी भेट घेऊन निवेदनाद्वारे त्यांना मागणी केली,

उन्हाळी सुट्टीत लहान मुलांना खेळण्यासाठी व परिवारातील लोकांना फिरण्यासाठी देगलुरात दुसरी कुठे जागा नसल्यामुळे, देगलूर नगर परिषदेच्या हद्दीतील श्री छत्रपती शिवाजी महाराज उघानाचे नुतन टेंडर काढून लहान मुलांना खेळण्यासाठी नविन साहित्य उपलब्ध करून देण्यात यावे, याकरिता देगलुरचे सामाजिक कार्यकर्ते धनाजी जोशी यांनी देगलूर नगर परिषदेच्या मुख्याधिकारी निलम कांबळे यांच्या लक्षात आणून दिले असता मुख्याधिकारी निलम कांबळे यांनी नगर परिषदेच्या सर्वसाधारण सभेत हा विषय चर्चेला घेऊ असे लेखी निवेदनाद्वारे संबंधित विभागाला सुचना दिल्या...

देगलुरातील वृध्द आजोबांना नातवंडे विचारतात कि आम्हाला शिवाजी पार्क ला कधी नेणार ? आम्हाला शिवाजी पार्क ला जाऊन खूप खेळायचे,मला तर एक महिना सुट्ट्या लागणार.....

## पळशी गट ग्रामपंचायत पाण्या मुळे महिला आक्रमक,ग्रामपंचायतवर गुंड मोर्चा काढून निषेध

लोकनेता न्यूज नेटवर्क

**मांडवी । डॉ.भारत उद्धव राठोड**

मांडवी:पळशी गट ग्रामपंचायत असुन खूप मोठे पाणी साठा असुन सुद्धा ग्रामपंचायतच्या नियोजनानसुन पळशी तांड्यावर भीषण पाणी टंचाई निर्माण झाली आहे महिलांनी ग्रामपंचायत येते आक्रमक भूमिका घेत पळशी ग्रामपंचायत कार्यालयावर समोर गुंड मोर्चा काढून निषेध करीत पाणीपुरवठा सुरळीत करण्याची मागणी करण्यात येत आहे



पळशी गट ग्रामपंचायत तालुका किनवट अंतर्गत पळशी, पळशी तांडा व लालू नाईक तांडा असे तीन गावाचा समावेश आहे पळशी व पळशी तांड्याला कणकी ग्रामपंचायत ची पाणी पुरवठा विहीर आहे भिलगाव येते पाणी पुरवठा करण्यात येते पळशी तांड्याला या नळ योजनेव्यतिरिक्त दुसरे कोणतेही पर्याय नाही

मागील काही दिवसापासून योग्य नियोजन अभावी पळशी तांड्यातील नागरिकांना तीव्र पाणीटंचाई समस्येला तोंड देत घडाभर पाण्यासाठी वन वन भटकावे लागत आहे पाणीटंचाईच्या समस्येला त्रासून अखेर महिलांनी दिनांक १ एप्रिल २०२६ रोजी ग्रामपंचायत कार्यालय पळशी वर गुंड मोर्चा काढून निषेध व्यक्त केला तांड्यावरील पाणीपुरवठा सुरळीत न केल्यास आमरण उपोषणास बसण्याचा इशाराही देण्यात आले येत्या दोन दिवसात पाणीपुरवठा सुरळीत करून देऊ असे आश्वासन ग्रामपंचायत अधिकारी टारपे यांनी दिल्याने महिला शांत झाल्या. यावेळी मांडवी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक गंगाधर गायकवाड यांनी बंदोबस लावले होते.

## स्पोर्ट्स कोट्यातून अमर येमलेची पोलीस दलात दमदार एन्ट्री!

## दयानंद वाणिज्य महाविद्यालयाचा विद्यार्थी नांदेड येथे पोलीस कॉन्स्टेबल पदावर नियुक्त

लोकनेता न्यूज नेटवर्क

**लातूर । शिवाजी निरमनाळे**

क्रीडा क्षेत्रातील सातत्यपूर्ण मेहनत, जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर दयानंद वाणिज्य महाविद्यालयाचा विद्यार्थी अमर येमले याने मोठे यश संपादन केले आहे. स्पोर्ट्स कोट्यामधून त्याची नांदेड येथे पोलीस कॉन्स्टेबल पदावर नियुक्ती झाली असून, त्याच्या या यशाबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे.अमर येमले हा महाविद्यालयाचा क्रीडाप्रेमी व मेहनती विद्यार्थी असून, अॅथलेटिक्स क्षेत्रात त्याने उल्लेखनीय कामगिरी केली आहे. त्याच्या या यशामुळे दयानंद वाणिज्य महाविद्यालयाच्या शैक्षणिक व क्रीडा परंपरेत आणखी एक मानाचा तुरा रोवला



गेला आहे. दयानंद वाणिज्य महाविद्यालयाने आजवर विविध क्षेत्रांमध्ये विद्यार्थ्यांचे करिअर घडविले असून, चार्टर्ड अकाउंटंट, प्रशासकीय अधिकारी तसेच यशस्वी उद्योजक घडविण्याची गौरवशाली परंपरा कायम ठेवली आहे. अमर येमलेचे यश हे त्याच परंपरेचे उत्कृष्ट उदाहरण ठरत आहे. या यशाबद्दल महाविद्यालयात शुक्रवारी विशेष सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले. प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर यांच्या हस्ते अमर येमलेचा सत्कार करण्यात आला. यावेळी उपप्राचार्य डॉ. गणेश लहाने, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. बाळासाहेब चव्हाण तसेच क्रीडा विभाग प्रमुख डॉ. अशोक वाघमारे उपस्थित होते. अमर येमलेच्या यशामागे क्रीडा विभाग प्रमुख डॉ. अशोक वाघमारे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले असून, त्यांच्या मार्गदर्शनामुळेच अमरने हे यश संपादन केल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

## माहूर तालुका क्रीडा संकुलाचे भूमिपूजन

## किनवट माहूर तालुक्याचे आ.भीमराव केराम यांच्या हस्ते दोन एप्रिल ला भूमिपूजन सोहळा पार पडणार

लोकनेता न्यूज नेटवर्क

**श्रीक्षेत्र माहूर । डॉ.भारत उद्धव राठोड**

नांदेड क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे अंतर्गत तालुका क्रीडा संकुल माहुरचा भुमीपुजन सोहळा आमदार भिमराव केराम विधानसभा सदस्य तथा अध्यक्ष तालुका क्रीडा संकुल समिती माहूर यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न होणार आहे. याप्रसंगी तालुका क्रीडा संकुल समितीचे सन्माननिय सदस्य व स्थानिक लोकप्रतिनिधी व विविध दैनिकाचे प्रतिनिधी व विविध खेळातील खेळाडूं यांच्या प्रमुख उपस्थितीत दि.०२ एप्रिल २०२६ रोजी दु. १.०० वा. तालुका क्रीडा संकुल मैदान पांडवलेनी शासकीय आदिवासी आश्रम शाळेजवळ माहूर येथे संपन्न होणार आहे.

तालुका क्रीडा संकुल, माहूर करीता गायरान गट क्रं. १९५ मधील क्षेत्र १ हेक्टर ४६ आर. शासकीय जागा प्राप्त आहे. सदर जागेवर क्रीडा सुविधेचे बांधकाम करणेकरीता रु ४९९.८८ लक्ष रक्कमेस प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे. यामध्ये मल्टीपर्पज इनडोअर हॉल २०० मी. धावनपथ कबडडी खो-खो व्हॉलीबॉल मैदान सिमेंट रोड व इतर कामे संरक्षण भिंत वॉचमन रुम गेट व इतर पाण्याची व्यवस्था अग्नीशमक ड्रेनेज लाईन सेप्टी टँक बोरवेल व इतर अनुषंगीक कामे इत्यादी बाबीचा समावेश आहे.

सदर भुमीपूजन सोहळा संपन्न झाल्यानंतर लवकरच कामास सुरुवात करण्यात येणार असून तालुक्यातील खेळाडूंना राज्य व राष्ट्रीय दर्जाच्या अदयावत क्रीडा सुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत. या भुमीपूजन सोहळयास तालुक्यातील खेळाडू, पालक व क्रीडाप्रेमी, विविध संघटनेचे पदाधिकारी, अधिकारी-कर्मचारी यांनी मोठया संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन तालुका क्रीडा अधिकारी बालाजी शिरसीकर यांनी केले आहे.



## नळातून पिवळ्या पाण्याचा लातूरकरांना पुरवठा

### भाजपा नगरसेवकांनी घेतली तातडीची बैठक



लोकनेता न्यूज नेटवर्क

**लातूर । शिवाजी निरमनाळे**

लातूरकरानां नळातून पिवळ्या पाण्याचा पुरवठा होत असल्याची माहिती मिळताच प्रभाग क्रमांक १५ चे भाजपा नगरसेवक प्रवीण कस्तुरे व माजी नगरसेवक पुनीत पाटील यांनी तातडीची पाणीपुरवठा विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांची तातडीची बैठक घेत उपायोजना करण्याच्या सूचना संबंधितांना दिल्या.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ७४९९६१५९३३ .या अंकात प्रकाशित झालेल्या बातम्या व लेखा या मधून व्यक्त झालेल्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही (वाद विवाद गेवराई न्यायालयाअंतर्गत)

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 7499615933